सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## सांस्कृतिक कार्य संचालनालय
## आयोजित

# ३० वी महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धा प्रवेशिकांकरिता निमंत्रण

३० व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेसाठी दि. २५ जानेवारी २०१८ पर्यंत व्यावसायिक नाट्य निर्मात्यांकडून प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

या स्पर्धेच्या प्रवेशिका व नियमावली खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

---

१) सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई–४०००३२, दूरध्वनी : ०२२ – २२०४३५५०

---

२) पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, रवींद्र नाट्यमंदिर, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई–४०० ०२५, दूरध्वनी : ०२२ – २४३६५९९०

---

तसेच www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या मथळ्याखाली प्रवेशिका व नियमावली प्राप्त करता येईल.

# महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेचे नियम

**१) संस्थेने अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार नाट्य संस्थांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सोबत जोडलेल्या (परिशिष्ट क्र.१ येथील) नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा. तसेच अर्जासोबत (परिशिष्ट क्र.२ येथे जोडलेल्या) विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र सादर करावे.

**२) स्पर्धेसाठीचे प्रवेश शुल्कः-** प्रत्येक नाटकासाठी रु. २,०००/- प्रवेश शुल्क आकारण्यात येईल व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**३) स्पर्धेसाठी संस्थेच्या नाटकांची संख्याः-** संस्था तिच्या इच्छेनुसार व्यावसायिक नाट्यस्पर्धेसाठी कितीही नाटके पाठवू शकेल. मात्र प्रत्येक नाट्य प्रयोगासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व स्वतंत्र प्रवेशशुल्क भरावे लागेल.

**४) व्यावसायिक नाट्य स्पर्धेसाठी अर्ज करणा-या नाट्यसंस्थांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहेः-**

१. स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा प्रवेश अर्ज भरतेवेळी त्या नाटकाचे ज्या वर्षासाठी स्पर्धा घेण्यात येत आहे त्या वर्षाच्या १ जानेवारी पासून ते ३१ डिसेंबर या कालावधीत किमान ५ व्यावसायिक नाट्यप्रयोग झाले असणे आवश्यक आहे. (व्यावसायिक नाट्यप्रयोग याचा अर्थ किमान ७०० आसन क्षमतेच्या नाट्यगृहात तिकिट लावून झालेले प्रयोग)

२. (अ) या स्पर्धेत पुनरुज्जीवित नाट्यकृतींनाही भाग घेता येईल. पुनरुज्जीवित नाटक याचा अर्थ कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या पूर्णतः नवीन संचात वेगळया नाट्यनिर्मात्यांनी सादर केलेली नाट्यकृती असा असले. (आ) स्पर्धेत एकदा सादर झालेली नाट्यकृती त्याच निर्मात्याला त्याच कलाकार तंत्रज्ञांच्या संचात पुन्हा सादर करता येणार नाही. (इ) एखाद्या वर्षी सादर झालेली नाट्यकृती त्याच कलाकारांच्या संचात अन्य निर्मात्याला किंवा अन्य कलाकारांच्या संचात त्याच निर्मात्याला स्पर्धेत सादर करता येणार नाही.

**५) इतर अन्य नियमः-**

१. स्पर्धेत ज्यांच्या नावे अर्ज पाठविला असेल त्यास बक्षीस दिले जाईल. मात्र अर्जावर निर्मात्याची सही असणे आवश्यक आहे.

२. स्पर्धा भरविण्यास कमीत कमी १० प्रवेशिका या नियमावलीच्या निकषानुसार स्पर्धेसाठी पात्र ठरणे आवश्यक आहे.

३. स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे स्वरुप, विशेषतः ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे. नाटकाचे लेखक, भाषांतरीत असल्यास मूळ नाटकाची भाषा, निर्देश करुन कळवावी लागेल. नाटय, कथा, कादंबरी वा इतर अन्य वाङ्मय प्रकारावर आधारीत असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.

४. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार शासनातर्फे संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राहील. तसेच ज्यांचे अर्ज नाकारण्यात आले त्यांना संचालनालय लेखी स्वरुपात ते अमान्य करण्याची कारणे कळवेल.

५. संस्थेने स्वतःच्या खर्चाने त्यांच्या नाटकाचा प्राथमिक फेरीसाठी प्रयोग सादर करावा. प्राथमिक फेरीतील प्रयोगास शासनातर्फे कुठलेही आर्थिक वा अन्य सहाय्य देण्यात येणार नाही. संस्थेमार्फत सादर होणा-या प्राथमिक फेरीतील नाटकाची तारीख सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत परिक्षकांना कळविण्यात येईल व परिक्षक सदर नाटकाचे परिक्षण करण्यासाठी हजर राहतील.

६. अंतिम स्पर्धेसाठी जास्तीत जास्त १० अथवा एकूण प्रवेशिकेच्या ५०% नाटकांची निवड केली जाईल.

७. अंतिम स्पर्धेत निवड झालेल्या संस्थांना मुंबई येथे अंतिम स्पर्धा झाल्यास रु. ६०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल आणि मुंबई बाहेर स्पर्धा झाल्यास रु.१,२०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल.

८. अंतिम फेरीच्या वेळी रु. ५०/- व रु. ३०/- दराची तिकीटे ठेवण्यात येतील व ती रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

९. व्यावसायिक नाटय स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी प्रथम पारितोषिक विजेत्या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येईल व त्यासाठी त्यांना नाटक सादरीकरणासाठी मुंबई येथे पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु. ६०,०००/- व मुंबई बाहेर पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु.१,२०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात येईल.

१०. संस्थेचे बँक अकाऊंट आणि पॅनकार्ड असणे गरजेचे आहे. त्याची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडावी लागेल.

११. व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी अर्ज सादर करणाऱ्या संस्थेच्या खोट्या कागदपत्रांबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास याप्रकरणी न्यायालयापुढे उत्तर देण्यास संबंधित संस्था जबाबदार राहील. याप्रकरणी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय अथवा शासन यांची कोणतीही भूमिका नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणी याचिकेस उत्तर देण्याची जबाबदारी पूर्णतः संस्थेची राहील.

□□□

# ३० वी महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाटयस्पर्धा, २०१७

## प्रवेशिका

(परिशिष्ट क्र.१)

| | | |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक नाटय संस्थेचे नाव | |
| २. | संस्थेचा कायमचा पत्ता<br><br>दूरध्वनी क्रमांक<br><br>भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ३. | संस्थेचे बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड नंबर व पॅनकार्ड क्रमांक यांची छायांकित प्रमाणित प्रत | |
| ४. | संस्थेचे स्थापना वर्ष | |
| ५. | स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे नावः- | |
| ६. | लेखकाचे नाव :- | |
| ७. | नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची तारीख व स्थळ | |
| ८. | संस्था जे नाटक स्पर्धेमध्ये सादर करु इच्छिते त्या नाटकाचे स्पर्धा वर्षाच्या १ जानेवारी २०१७ पासून ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीतील किमान ५ नाटयप्रयोग झाले असल्याचे पुरावे. (वृत्तपत्र जाहिरातीचे कात्रण व नाट्यगृह भाडे पावती इ. पुरावे सोबत जोडावे) | |
| ९. | नाटकाची संहिता रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडून प्रमाणित केल्याचे मंडळाचे प्रमाणपत्र | |
| १०. | नाटककाराचे / लेखकाचे सदर नाटक स्पर्धेत सादर करण्याबाबत परवानगी देणारे पत्र | |
| ११. | नाटकातील कलाकारांच्या नावाची पत्त्यासह, भूमिकेसह व दूरध्वनी क्रमांकासह यादी. तसेच दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत आदी तांत्रिक बाबी सांभाळणाऱ्या कलावंतांची / तंत्रज्ञांची सोबत स्वतंत्र यादी जोडली आहे काय ? | |
| १२. | प्रवेशशुल्क रु.२,०००/- चा धनाकर्ष (DD) जोडणे.<br>Director, Cultural Affairs, Govt. of Maharashtra, Mumbai या नावाने धनाकर्ष (DD) काढावा. | |

| | | |
|---|---|---|
| १३. | नाट्यप्रयोगांच्या तारखा आणि नाट्यगृह यांचा तपशिल स्वतंत्र जोडला आहे काय ? (दि. १ फेब्रुवारी ते १० मार्च २०१८ पर्यंतच्या प्रयोगाच्या तारखा) | |

**नाटयनिर्मात्याची स्वाक्षरी :**

**संस्थेचा शिक्का :**

**संस्थेचे नाव :-**

**संस्थेचा पत्ता :-**

**दुरध्वनी क्रमांक :-**

**भ्रमणध्वनी क्रमांक :-**

**स्थळ :-**

**दिनांक :-**

(परिशिष्ट क्र.२)

# प्रतिज्ञापत्र

**दिनांक :**

**प्रति,**

संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, नाट्यस्पर्धेतील विहित नमुन्यातील अर्जात सादर केलेली माहिती सत्य व बरोबर आहे. स्पर्धेचे सर्व नियम वाचले असून त्या सर्वांचे पालन करण्यात येईल. राज्य शासनाच्या मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत. कुठल्याही अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. शासनाने या स्पर्धेसाठी नियुक्त केलेल्या परिक्षण समितीने माझ्या नाटकाकरीता दिलेल्या गुणांच्या अनुषंगाने शासनाने घेतलेला अंतीम निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील व त्यावर अपील करण्याची मुभा मला राहणार नाही ही बाब मला मान्य आहे.

सदर स्पर्धेत मला पारितोषिक प्राप्त झाल्यावर जर कोणा त्रयस्थ व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतला तर त्याचे पूर्ण निराकरण मी स्वत:चे जबाबदारीवर व स्वत:च्या खर्चाने करु, शिवाय अशा आक्षेपामुळे शासनास जर काही आर्थिक नुकसान अथवा खर्च करावा / सोसावा लागला तर त्याची तात्काळ परतफेड करण्याचे मी मान्य करीत आहे.

मी दिलेली माहिती पूणत: सत्य असून त्यातील काही माहिती असत्य आढल्यास मी कायदेशीर कावाईस पात्र राहीन. मी दिलेली कोणतीही असत्य माहितीच्या आधारे या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त केल्यास सदर पारितोषिकाची रक्कम मी शासनास परत करण्याची हमी देतो.

**नाटयनिर्मात्याची स्वाक्षरी :**

**संस्थेचा शिक्का :**

**संस्थेचे नाव :-**

**संस्थेचा पत्ता :-**

**दुरध्वनी क्रमांक :-**

**भ्रमणध्वनी क्रमांक :-**

**स्थळ :-**